<u>रेग्युलर कज्जा क्रं.४७/२००७ मधील निशाणी ७८ वरील आदेश</u>.
**(CNR NO.MHKO07-000138-2007 )**

१. प्रस्तुत अर्ज वादीने या दाव्याच्या कामी सी.पी.सी. ऑर्डर १ रुल १० प्रमाणे प्रतिवादी म्हणून सामील करुन घेणेबाबत दाखल केला आहे.

२. वादीचे कथनानुसार प्रस्तुतचा दावा वाटपासाठी व कब्जेसाठी प्रतिवादी विरुध्द दाखल केला आहे. प्रतिवादी नं.३ यांनी नि.६५ कडे कैफियत देवून मालूताई आप्पासाहेब शिरोटे यांना याकामी पक्षकार म्हणून सामील केले नाही म्हणून तक्रार केलेली आहे. मालुतई यांचे मुलांना याकामी पक्षकार केलेले आहे. तथापी तांत्रिक अडचण राहु नये म्हणून श्री.आप्पासाहेब दादा शिरोटे (खातेदार) यांना पक्षकार करणे जरुरीचे आहे. सदरचा दावा हा वाटपाचा असलेनेव दावेचे निकालानंतर बजावणीकामी कोणतीही अडचण येवू नये म्हणून त्यांना पक्षकार करणे आवश्यक आहे. तरी श्री.आप्पासाहेब दादा शिरोटे (खातेदार) यांना याकामी प्रतिवादी नं.१६ म्हणून सामील करणेत यावे ही विनंती केली आहे.

३. प्रतिवादी तर्फे सदरचे अर्जावर आपले म्हणणे दिलेले नाही.

४. अर्जाचे अवलोकन केले. वादीचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणातील कागदपत्राचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी पृथक कब्जासाठी दाखल केलेला आहे. त्यास प्रतिवादी क्रं ३ व ४ यांने नि.६५ ला कैफियत देवून वादी यांने दाव्यात आवश्यक सर्व पक्षकार केले नसल्याचा मुद्दा उपस्थीत केला आहे व त्या अनुषगांने वादी याने प्रस्तुतचा अर्जान्वये मयत मालूताई आप्पासाहेब शिरोटे याच्या वारसदरांना पक्षकार करण्याबबत विनंती अर्ज् केला आहे. अशा परिस्थीततीत दाव्याचा विषय पाहता प्रस्तुतची दुरुस्ती ही वादी व प्रतिवादी यांच्यामधील वाद अंतिमरित्या निकाली काढण्यासाठी आवश्यक आहे असे दिसून येते. दुरुस्ती अर्जाचा विचार करताना दुरुस्तीचा दाव्याच्या अंतीम गुणावगुणावर काय परिणाम होईल याचा विचार करणे आवश्यक नाही हे संमत न्यायतत्व आहे. दुरुस्तीस मंजुरी दिल्यास दाव्यातील गुंतागुंत कमी होणार आहे. प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास कोणतीही नवीन केस अथवा दावा निर्माण होत नसुन दाव्याचे स्वरुप बदलत नाही. उलटपक्षी सदरहू

दुरुस्तीमुळे प्रस्तुत प्रकरणातील परिस्थिती याचा विचार करता माझे मते मागणी केलेली दुरुस्ती मंजुर केल्यामुळे पक्षकारांमधील खराखुरा वादातीत प्रश्न अंतीमरित्या निर्णीत करण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादींना नुकसान पोहोचत नाही. सबब, मी खालील आदेश पारित करतोः-

| | <u>आदेश</u> | |
|---|---|---|
| १ | प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादींना र.₹३००/– इतका खर्च म्हणुन प्रतिवादीनां यांच्या देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे. | |
| २ | वादींनी आजपासून १४ दिवसात दाव्यामध्ये आवश्यक ती दुरुस्त करुन दाव्याची दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी. वादीने विहीत मुदतीत दुरुस्ती न केल्यास सदरचा आदेश रद्द समजण्यात यावा. | |
| ३ | वादींनी आदेशाची पुर्तता केल्यानंतर नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या प्रतिवादींना दावे कामी समन्स काढण्यात यावेत. | |

सही/-
(विश्वास पां.शिंदे)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
जयसिंगपूर.

ठिकाणः-जयसिंगपूर.
दिनांकः-१४/०९/२०१८.